महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८६ दिनांक ३० / ०१ / २०१२

विषय : **गजानन हार्ट हॉस्पिटल, जळगाव** या रुग्णालयास महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचिवर समाविष्ट करण्याबाबत.

संदर्भ : सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना, सा.आ.क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) मध्ये समावेश असलेल्या गंभीर आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया कंपनीच्या मान्यताप्राप्त सुचीवरील विविध खाजगी रुग्णालयामध्ये करुन घेतल्यास त्याप्रित्यर्थ होणा-या खर्चाची कंपनीकडून प्रतिपूर्ती मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर सुचीमध्ये गजानन हार्ट हॉस्पिटल, जळगाव या रुग्णालयाचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन होता.

२. मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी वैद्यकीय सल्लागार व कार्यकारी संचालक (मा.सं) यांच्याशी विचारविनिमय करुन निम्ननिर्देशित खाजगी रुग्णालयात त्यांच्या नावासमोर रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या गंभीर आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया करुन घेता येणे त्या भागातील कर्मचाऱ्यांना सोयीस्कर व्हावे म्हणून सदर रुग्णालय महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर घेण्यासाठी मंजुरी प्रदान केली आहे.

| अ. क्र. | रुग्णालयाचे नाव | पत्ता | उपचारासाठीचे गंभीर/शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | **गजानन हार्ट हॉस्पिटल, जळगाव** | **प्लॉट नं.३७०, जनरल पोस्ट ऑफिस समोर, ओंकारनगर, जिल्हा पेठ, जळगाव.** | **ह्दयविकार उपचार व शस्त्रक्रिया** |

३. महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी उपरोल्लेखित रुग्णालयात/संस्थेमध्ये रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांना नियमानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सदरच्या रुग्णालयात उपरोक्त आजारांसाठी उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास रुग्णालयाच्या एकूण देयकावर (Excluding Cost of Valve,Stent,Implant, any devices & Medicines) वर **१० %** सवलत रुग्णालयाकडून मिळेल, तसेच रुग्णालयाने कळविलेली **दरसुची पुढील तीन वर्षासाठी कायम राहील**.

५. सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतूदी अबाधित राहतील.

६. या संदर्भात वरील आजांरावर कर्मचाऱ्यांच्या अवलंबित **कुटुंबियांनी** सदरच्या रुग्णालयात **स्वखर्चाने** उपचार/शस्त्रक्रिया करून घेतल्यास, रुग्णालयातर्फे एकूण देयकावर (Excluding Cost of Valve,Stent,Implant, any devices & Medicines) १० % सवलत देण्यात येईल. सदर उपचार/शस्त्रक्रिया कर्मचाऱ्याने अवलंबितासाठी **स्वखर्चाने** करावयाची आहे व त्याचा खर्च परस्पर **रुग्णालयास भरावयाचा** आहे. सदरच्या खर्चास कंपनी जबाबदार राहणार नाही.

७ सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

८. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(विजय भि. बागुल) ३०/१/२०१२
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

D:\O&M\Hospitals\Adm.Cir,Dr.Ltr - Vertex Hospital,Mulund (W) Mumbai.doc
30/01/12